सगळ्या कार्यशाळांना लागू आहे असा गैरसमज करुन घेऊ नका. गौरी केंद्रे, वामन केंद्रे, जयदेव हट्टंगडी, विद्या पटवर्धन अशासारखे सन्माननीय अपवादही आहेत. मुलांचे पालक आणि तरुण मुलं अशा प्रलोभनांना बळी पडतात त्यांच्यासाठी हा धोक्याचा इशारा. या अभिनय शिबीरांना नाट्यपरिषदेची मान्यता हवी. अशी मान्यता मिळवण्यासाठी कार्यशाळा संचालकांनी कोणत्या अटी पाळायला हव्यात त्याचे निकष कोणते ह्याची सविस्तर योजना मी नाट्यपरिषदेकडे पाठवीत आहे. अर्थात अशी मान्यता मिळवणं हे बंधनकारक नाही. ज्यांना मान्यतेची गरज नाही किंवा ज्यांना मान्यता मिळवणं अडचणीचं आहे त्यांनी आपल्या कार्यशाळा खुशाल चालवाव्यात. नाहीतरी आपल्याकडे मान्यता नसलेल्या अनेक शिक्षण संस्था सुखेनैव चालू असतात आणि त्यात अनेक जण डोळे मिटून प्रवेश घेतात. सुरक्षिततेसाठी आणि हितासाठी निर्माण केलेली यंत्रणा वापरणं कुणावरही बंधनकारक नाही.

दूरदर्शनवरील मालिकांचं आक्रमण हे नाटकाचा प्रेक्षकवर्ग घटण्याचं एक कारण निश्चित आहे पण एकमेव नाही. दिवाणखान्यात पोहोचलेल्या या माध्यमानं नाटकाच्या प्रेक्षकाच्या संख्येवर आणि वाईट म्हणजे त्यांच्या अभिरुचीवर विपरीत परिणाम केला आहे ही वस्तुस्थिती आहे. वाहिन्यांवरुन होणारा मालिकांचा मारा आपण थांबवू शकत नाही. त्यांचा दर्जा सुधारणं आपल्या हातात नाही. नाटकातील कलावतांना त्यात भाग घ्यायला आपण प्रतिबंध करु शकत नाही. प्रेक्षकांना त्या पहाण्यापासून आपण अडवू शकत नाही. हे वास्तव जर आपण बदलू शकत नाही तर कुणाच्या तरी नावानं बोटं मोडण्यापेक्षा हे वास्तव स्वीकारुन त्यातून मार्ग काय निघतो हे आपण बघितलं पाहिजे.

मित्रानो, कोणतंही माध्यम वाईट नसतं. ते बरं वाईट ठरतं ते माध्यम राबवणाऱ्या यंत्रणेच्या दृष्टिकोनावर. दूरदर्शन माध्यमाचं सामर्थ्य वादातीत आहे. ते जसं अभिरुची बिघडवू शकतं तसं ती घडवूही शकतं. या माध्यमाचा उपयोग रंगभूमीच्या विकासासाठी होऊ शकतो. काही वर्षांपूवी दूरदर्शनवर नाट्यावलोकन हा कार्यक्रम निर्माते विनायक चासकर सादर करीत असत. दर्जेदार नाटकांची समीक्षा, गुणदोषांची चर्चा आणि नाटकातली काही दृश्यं असं स्वरुप असलेल्या या कार्यक्रमाला प्रचंड लोकप्रियता मिळाली ती निर्मात्याच्या चोखंदळ निवडीमुळे. सुजाण प्रेक्षकांना दर्जेदार नाटकं प्रेक्षागृहात जाऊन पहायला उद्युक्त करणं हे या